आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२७ डिसेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचे माजी प्रधानमंत्री डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे देशभरात सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

- मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांसह जगभरातून शोक व्यक्त

- देशातल्या बँकांच्या नफ्यात २०२३-२४ या आर्थिक वर्षापर्यंत सलग सहा वर्षं वाढ झाल्याची रिझर्व्ह बँकेच्या अहवालात माहिती

**आणि**

- बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या ४७४ धावा, भारताची फलंदाजी गडगडली

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचं काल नवी दिल्ली इथं वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. काल संध्याकाळी प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्यांना नवी दिल्लीतल्या एम्स रुग्णालयात दाखल केलं होतं. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

*26 सप्टेंबर 1932 रोजी फाळणीपूर्व भारताच्या पंजाब प्रांतातल्या एका गावात जन्मलेल्या, डॉ. मनमोहन सिंग यांनी 2004 ते 2014 या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखालच्या यूपीए सरकारमध्ये सलग दोन वेळा प्रधानमंत्री पदाचा कार्यभार सांभाळला.*

*ऑक्सफर्डमधून अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवल्यावर मनमोहन सिंग यांनी काही काळ संयुक्त राष्ट्रांसाठी काम केलं. 1971 मध्ये, ते भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून रुजू झाले. त्यांनी अर्थ मंत्रालयात मुख्य आर्थिक सल्लागार आणि सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, प्रधानमंत्र्याचे सल्लागार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही काम केलं. डॉ. मनमोहन सिंग यांनी 1991 आणि 1996 मध्ये केंद्रीय अर्थमंत्री म्हणून काम केलं, आणि आर्थिक सुधारणांचं व्यापक धोरण आखलं.*

*तत्कालीन प्रधानमंत्री पीव्ही नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारमध्ये अर्थमंत्री असलेले डॉ. सिंग यांना 1991 मधल्या आर्थिक सुधारणांचे शिल्पकार समजलं जातं, ज्याने आर्थिक उदारीकरणाच्या युगाची सुरुवात झाली. डॉ. सिंग 1991 ते 2024 या काळात राज्यसभेचे सदस्य होते. 33 वर्षांच्या सेवेनंतर ते यंदाच्या एप्रिलमध्ये राज्यसभेतून निवृत्त झाले.*

*महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, माहितीचा अधिकार कायदा आणि राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा, हे डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या प्रधानमंत्रीपदाच्या कार्यकाळात घेतलेले महत्वाचे निर्णय होते.*

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानी आज नागरिकांना त्यांच्या पार्थिवाचं दर्शन घेता येईल. उद्या सकाळी काँग्रेस मुख्यालयात त्यांचं पार्थिव आणलं जाईल, आणि त्यानंतर सकाळी साडे नऊ वाजता काँग्रेस मुख्यालयातून डॉ. मनमोहन सिंग यांची

अंत्ययात्रा निघेल. डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनाबद्दल सरकारनं ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. डॉ सिंग हे अशा दुर्मिळ राजकारण्यांपैकी एक होते, ज्यांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही विश्वात आपला ठसा उमटवला, असं राष्ट्रपतींनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग हे असामान्य अर्थ तज्ञ होते, ज्यांनी भारताच्या आर्थिक परिप्रेक्षात परिवर्तन घडवलं, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताच्या आर्थिक धोरणावर मजबूत ठसा उमटवल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. डॉ. सिंग यांनी आपल्या प्रधानमंत्री पदाच्या कार्यकाळात सर्वसामान्य नागरिकांचं जीवन सुधारण्यासाठी केलेल्या व्यापक प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा केली आहे.

डॉ.मनमोहन सिंग यांनी आरबीआयचे गव्हर्नर ते अर्थमंत्री आणि प्रधानमंत्री म्हणून देशाच्या कारभारात महत्त्वाची भूमिका बजावल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

डॉ. सिंग यांच्या नेतृत्वानं पक्षपातळीवर प्रशंसा आणि आदर मिळवला असून, त्यांचा वारसा पिढ्यानपिढ्या राष्ट्र उभारणीसाठी प्रेरणा देत राहील, असं भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा यांनी म्हटलं आहे.

डॉ. सिंग यांचे नेतृत्व, नम्रता आणि समर्पण सदैव स्मरणात राहील, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

भारतानं एक दूरदर्शी राजकारणी, अभेद्य एकतेचा नेता आणि अतुलनीय उंचीचा अर्थतज्ज्ञ गमावल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

डॉ. मनमोहन सिंग यांनी असामान्य शहाणपण आणि सचोटीनं भारताचं नेतृत्व केलं. त्यांची नम्रता आणि अर्थशास्त्राची सखोल जाण यामुळे देशाला प्रेरणा मिळाली, असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

माजी प्रधानमंत्री डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी शोक व्यक्त केला आहे. भारताचे अर्थमंत्री म्हणून सर्वात आव्हानात्मक काळात त्यांनी देशाला आर्थिक संकटातून यशस्वीपणे पुढे नेलं आणि जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा पाया घातला, असं त्यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, कॅबिनेट मंत्री रामदास आठवले यांनी माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल जगभरातल्या नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. अफगाणिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष हमीद

करझाई, मालदीवचे माजी राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नाशीद, भारतातले रशियाचे राजदूत डेनिस अलीपोव्ह यांनी डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल समाज माध्यमावर शोक व्यक्त केला आहे.

<><><><>

देशातल्या बँकांच्या नफ्यात २०२३-२४ या आर्थिक वर्षापर्यंत सलग सहा वर्षं वाढ झाली असून, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीतही वाढीचा कल कायम असल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं देशातील बँकिंग आणि त्यातला कल याबाबतचा एक अहवाल काल प्रसिद्ध केला, त्यात ही माहिती देण्यात आली आहे. बँकांच्या मालमत्तेची गुणवत्ता सुधारत राहिली असून, अनुत्पादित कर्जांचं प्रमाण 13 वर्षांतील सर्वांत कमी पातळीवर राहिलं. चालू वर्षाच्या मार्च अखेरीला एनपीए २ पूर्णांक ७ दशांश टक्के आणि सप्टेंबरच्या अखेरीला २ पूर्णांक ५ दशांश टक्के नोंदवलं गेल्याचंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. सलग तिसऱ्या वर्षी नागरी सहकारी बँकांच्या मालमत्तेची गुणवत्ता सुधारली आहे. भांडवल पर्याप्तता आणि नफाही वाढला आहे. बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांनी कर्जवितरणात दुहेरी आकड्यात वाढ दर्शविली आहे, तर त्यांच्या एकूण थकीत कर्जांचे प्रमाण या वर्षी सप्टेंबरच्या अखेरीस ३ पूर्णांक ४ दशांश टक्क्यापर्यंत घसरले आहे, असे रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

<><><><>

छत्रपती संभाजीनगर इथल्या जल आणि भूमी व्यवस्थापन संस्थेसाठी ५४६ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून शासनस्तरावर यासाठीचे प्रस्ताव मार्गी लावू, असं मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी म्हटलं आहे. संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेची आढावा बैठक काल झाली त्यावेळी ते बोलत होते. जल आणि भूमी व्यवस्थापन संस्थेला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी सुविधा विकास, पदभरती, विस्तार अशा कामांचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातल्या २६ प्रभागांत मोहिम सुरू असून ती १०० दिवस चालणार आहे. आहे. या कालावधीत निःक्षय प्रतिज्ञेचं वाचन, निक्षय शिबीर, शाळा आणि महाविद्यालयांत विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांद्वारे निक्षय सप्ताह साजरा केला जात आहे.

**<><><><><>**

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे विशेष रेल्वे गाड्या चालवणार आहे. मध्य रेल्वेवर विशेष रेल्वे गाडी सीएसएमटी स्थानकातून आणि कल्याणहून पहाटे दीड वाजता सुटेल. हार्बर मार्गावर ही विशेष रेल्वे गाडी सीएसएमटी आणि पनवेल इथून पहाटे दीड वाजता सुटेल. पश्चिम रेल्वेवर देखील चर्चगेट आणि विरार दरम्यान विशेष गाड्या चालवल्या जातील. पहिली ट्रेन चर्चगेटहून पहाटे सव्वा वाजता, दुसरी २ वाजता, तिसरी अडीच वाजता आणि चौथी पहाटे ३ वाजून २५ मिनीटांनी

सुटेल. विरारहून पहाटे सव्वा बारा वाजता, त्यानंतर पाऊण वाजता, १ वाजून ४० मिनीटांनी वाजता आणि शेवटची गाडी पहाटे ३ वाजून ५ वाजता सुटेल.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथं सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्याच्या आज दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात सर्व बाद ४७४ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजी गडगडली. विराट कोहली आणि के एल राहुल हे दोघं अनुक्रमे ३६ आणि २४ धावांवर बाद झाले. रोहित शर्मा अवघ्या तीन धावा करू शकला तर आकाशदीप शून्यावर बाद झाला. सलामीला उतरलेल्या यशस्वी जयस्वालने ८२ धावा केल्या. या धावांच्या बळावर आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या पाच बाद १६४ धावा झाल्या होत्या. दरम्यान, माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी भारतीय संघाचे खेळाडू दंडावर काळ्या फिती बांधून खेळत होते.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये आयसीसी चॅम्पियनशिप स्पर्धेत आज तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात भारतीय संघाने वेस्ट इंडिजच्या संघावर पाच गडी राखून विजय मिळवला आणि मालिकेतही ३-० असा विजय मिळवला. वडोदरा इथं झालेल्या या सामन्यात वेस्ट इंडिजनं नाणेफेक जिंकून प्रथम

फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वेस्ट इंडिजने ३८ षटकात सर्वबाद १६२ धावा केल्या. विजयासाठी भारतासमोर १६३ धावांचं आव्हान होतं. भारताने हे आव्हान अवघ्या २८ षटकांत १६७ धावा करत पार केलं.

**//<><><><><>//**